**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८



दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १५ वा ● शुक्रवार ०१ जून २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 15 | Date : 01/06/2024 blow Saturday Page 4 Price 4


# पंढरीच्या विठ्ठल मंदिरात आढळले तळघर; सापडल्या प्राचीन मूर्ती




**पंढरपूर/प्रतिनिधी:**

येथील श्री विठ्ठल मंदिरात एक तळघर आढळून आले. मंदिराचे संवर्धनाचे काम सुरू आहे. फरशीचे काम करत असताना एक पोकळी दिसून आली. साधारणपणे पाच ते सहा फूट खोल एक खोली आहे. पुरातत्त्व विभागाने मंदिरात आढळलेल्या तळघराची पाहणी केली. यामध्ये विष्णूच्या दोन, तर महिषासुरमर्दिनी, तसेच पादुका आणि दोन छोट्या मूर्ती आढळून आल्या आहेत. तसेच काही जुनी नाणीदेखील आढळली. या मूर्ती साधारणपणे सोळाव्या शतकातील असतील, असे पुरातत्त्व विभागाचे सहायक संचालक विलास वाहने यांनी सांगितले. मात्र, याबाबत संशोधन केल्यानंतर अधिक माहिती समोर येईल. हे तळघर पाच फूट, पाच फुटांचे असून, उंची सहा फूट आहे.

विठ्ठल रुक्मिणी मंदिर पुरातन असल्याने याचे संवर्धन व सुशोभीकरण करण्याचे काम सुरू असून विठ्ठल मंदिरातील हनुमान दरवाजा येथील फरशी काढत असताना खाली तळघर आढळून आले. यामध्ये देवी, देवतांच्या प्राचीन तीन मूर्ती आढळून आल्या आहेत. तळघरात आणखीन काय असेल याची उत्सुकता आता महाराष्ट्राला लागली आहे. विठ्ठल रुक्मिणी मंदिर प्राचीन असल्याने याचे संवर्धन व सुशोभीकरण करण्यासाठी शासनाने दीडशे कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. या निधीमधून संवर्धनाचे काम सुरू आहे. शासनाकडून पहिल्या टप्प्यातील कामांसाठी ७३ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे. विठ्ठल रुक्मिणी गाभारा, चौखांबी, सोळखांबी आदींचे काम पूर्ण झाले आहे. मंदिरालाप्राचीन लूक देण्यात आला आहे. १५ फेब्रुवारी २०२४ पासून पदस्पर्श दर्शन बंद असून केवळ पहाटे पाच ते सकाळी अकरा वाजेर्यंत भाविकांना विठ्ठलाचे मुखदर्शन सुरु आहे. मंदिरातील काम आषाढी यात्रे अगोदर पूर्णकरण्यासाठी दिवसरात्र काम सुरु आहे. येत्या दोन जून पासून विठ्ठलाचे पदस्पर्श दर्शन सुरू करण्यात येणार आहे. दरम्यान गुरुवारी (ता.३०) रात्री विठ्ठल मंदिरातील सोळखांबी जवळील हनुमान गेट किंवा दरवाजा येथील फ्लोरिंगचे काम सुरु होते. त्या भागातील फ्लोरिंगची दगडी फरशीला चुना लावण्यात येत होता. त्यावेळी तेथील फ्लोरिंगचा दगडी फरशी काढत असताना **। पान २ वर**

## प्रज्ज्वल रेवण्णाला ६ जूनपर्यंत पोलीस कोठडी



**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज** कर्नाटकमधील सेक्स टेप प्रकरणी आरोपी प्रज्वल रेवण्णाला आज पोलिसांनी बंगुळूरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरून अटक केली होती. तसेच त्याला आज विशेष न्यायालयात हजर करण्यात आले होते. दरम्यान, न्यायालयाने आता त्याला आता ६ जूनपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे .महिन्याभरापूर्वी सेक्स टेप प्रकरण उजेडात आल्यानंतर प्रज्वल रेवण्णाने भारतातून पळ काढला होता. तसेच तो जर्मनीत असल्याची माहिती पुढे आली होती. त्यानंतर काही दिवसांपूर्वी त्याने एक व्हिडीओ शेअर करत आपण ३१ मे रोजी भारतात आत्मसमर्पण करणार असल्याचे सांगितले होते. त्यानुसार प्रज्वल रेवण्णा आज सकाळी भारतात दाखल झाला. दरम्यान, रेवण्णा भारतात दाखल होताच कर्नाटक पोलिसांच्या विशेष पथकाने त्याला बंगुळूरूच्या केम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन अटक केली. त्यानंतर त्याला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात नेण्यात आले. तसेच त्याला विशेष न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्याला सहा दिवसांची पोलीस कोठडी सुनावली.

जवळपास महिन्याभरापूर्वी कर्नाटकमधील मतदानानंतर हे सगळं प्रकरण उघड झालं. प्रज्वल रेवण्णाच्या ड्रायव्हरनंच या सगळ्या क्लिप असणारा पेनड्राईव्ह पोलिसांच्या हवाली केला होता. त्यानंतर पोलिसांनी प्रज्वल रेवण्णाचा शोध सुरू केला.

मात्र, तोपर्यंत तो विदेशात फरार झाला होता. त्याच्याविरोधात लुकआऊट नोटिसाही काढण्यात आल्या होत्या. गेल्या महिन्याभरात त्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नव्हता. तसेच, त्याच्याकडून या संपूर्ण प्रकरणावर कोणतंही भाष्य किंवा बाजू मांडण्यात आली नव्हती.

# मध्य,ईशान्य आणि उत्तर भारतात उष्णतेची लाट

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

नवी दिल्ली : मध्य, ईशान्य, आणि उत्तर भारतातील अनेक ठिकाणी उष्णतेची लाट जाणवत आहे. यामुळे अनेकजण उष्माघाताचे बळी पडले असून आतापर्यंत ५४ लोकांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. उत्तर भारतात अनेक ठिकाणी ४५ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली आहे. दि. ३१ मे ते १ जून दरम्यान उत्तर प्रदेशमध्ये आणि ३१ मे रोजी हरियाणा, चंदीगढ आणइ दिल्लीत धुळीचे वादळ धडकणार असल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, ३१ मे ते २ जून

### आतापर्यंत ५४ जणांचा मृत्यू, उत्तर भारत उकाड्याने हैराण



दरम्यान वायव्य भारतातील मैदानी भागात गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासंह हलक्या सरी पडण्याचा अंदाज आहे. दिल्लीमध्ये गुरुवारी सर्वाधिक ४५.६ अंश **। पान २ वर**

## सोलापुरात तापमानाचा पारा पुन्हा चाळिशी पार

**सोलापूर/प्रतिनिधी :**

चार दिवसांपूर्वी रोहिणी नक्षत्राच्या पावसाने जोरदार हजेरी लावल्यानंतर थंडावलेले तापमान पुन्हा वाढू लागल्यामुळे सोलापूरकर हैराण झाले आहे. तापमानाचा पारा पुन्हा ३४.८ अंशांवरून पुन्हा चाळिशी पार केला आहे.

वाढत्या तापमानामुळे उष्माही वाढल्यामुळे सुटलेल्या घामाने सोलापूरकर त्रस्त झाले आहेत. २६ मे रोजी शहर व जिल्ह्यात वादळी वारे, ढगांचा गडगडाट आणि विजांच्या कडकडाटासह सरासरी २५ मिलीमीटर एवढा जोरदार पाऊस पडला होता. त्यामुळे हवामानात बदल होऊन तापमान ४२ अंशांवरून थेट ३४ अंशांवर उतरले होते. परंतु त्यानंतर पुन्हा पावसाच्या सरी कोसळल्या नाहीत. परिणामी, तापमान पुन्हा हळूहळू वाढत चाळिशी पार करीत आहे. काल गुरूवारी ४० अंशांवर तापमान मोजल्यानंतर शुक्रवारी दुस-या दिवशी त्यात पुन्हा वाढ होऊन ४०.४ अंशांवर तापमान पोहोचले. दरम्यान, यंदाच्या असह्य उन्हाळ्यात तापमानामुळे अंगाची लाही लाही होत असताना ताप, उलटी, जुलाब आदी आजार वाढत आहेत. शरीरातील तापमान १०२ ते १०६ डिग्री सेल्सिएसपर्यंत वाढलेल्या रूग्णांची संख्या वाढत असल्याचे वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर मंडळी सांगतात.

## ‘एअर इंडिया’च्या विमानाला ३० तास उशीर; प्रवाशांचे प्रचंड हाल

### ‘डीजीसीए’ची कारणे दाखवा नोटीस

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

दिल्लीहून सॅन फ्रान्सिस्कोला जाणाऱ्या ‘एअर इंडिया’च्या विमानाला तब्बल ३० तास उशीर



झाल्यामुळे २००पेक्षा जास्त प्रवाशांचे प्रचंड हाल झाले. तांत्रिक बिघाड, कार्यरत नसलेली वातानुकूलन यंत्रणा आणि पेलोडच्या समस्या यामुळे हा उशीर झाल्याचे सांगण्यात आले. या पार्श्र्वभूमीवर शुक्रवारी सकाळी नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) ‘एअर इंडिया’ला विमानांना होणारा उशीर आणि प्रवाशांची काळजी घेण्यात आलेले अपयश या मुद्द्यांवरून कारणे दाखवा नोटीस बजावली. ‘एअर इंडिया’कडून माहिती देण्यात आलेली नाही.

पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार हे विमान गुरुवारी दुपारी साडेतीन वाजता उड्डाण करणार होते. आधी त्याला सहा तास उशीर होऊन त्याचे उड्डाण शुक्रवारी होईल अे सांगण्यात आले. शुक्रवारी, **। पान २ वर**

## एसटीचा ७६ वा वर्धापन दिन प्रत्येक बसस्थानकावर साजरा होणार

**मुंबई /दैनिक यशसिध्दि न्यूज**

पुणे - अहमदनगर मार्गावर १ जून, १९४८ रोजी एसटीची पहिली बस धावली. त्या निमित्ताने दरवर्षी १ जून हा एसटीचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. त्यामुळे शनिवार, १ जून रोजी एसटीच्या सर्व बसस्थानकांवर प्रवासी व सर्व कर्मचारी बांधवांना साखर पेढे वाटून शुभेच्छा देण्यात येणार आहेत. वर्धापन दिनानिमित्त सर्व बसस्थानकांलक रांगोळी काढून, फुला- पानांची तोरणे बांधून सजविण्यात येणार आहेत.

गेली ७६ वर्षे राज्यातील सर्वसामान्य जनतेला सुरक्षित व किफायतशीर प्रवासी दळणवळण सेवा देण्याचे प्रयत्न एसटी प्रामाणिकपणे करत आली आहे. आताही ऊन, वारा, पावसाची तमा न



बाळगता अनेक अडचणी, अडथळे, आर्थिक संकटावर मात करत राज्याच्या डोंगरदऱ्यातील वाड्या वस्त्यांपासून आदिवासी पाड्यांपर्यंत एसटी आपली प्रवासी दळणवळण सेवा देत आहे. त्यासाठी ८७ हजार कर्मचारी व अधिकारी रात्रंदिवस राबत आहेत. केवळ ३६ बेडफोर्ड बसवर सुरू **। पान २ वर**

## पंचायत समिती अक्कलकोट येथे आनंदी सेवा निवृत्ती दिन साजरा

**अक्कलकोट/प्रतिनीधी**

जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या संकल्पनेतून ३१ मे २०२४ रोजी सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी शिक्षक कर्मचाऱ्यांना त्याच दिवशी सेवानिवृत्त आदेश देण्याचा संकल्प केला होता त्याप्रमाणे अक्कलकोट तालुक्यामधील दिनांक ३१ मे २०२४ सेवानिवृत्त होणारे विस्तार अधिकारी कृषी १ विस्तार अधिकारी शिक्षण २ आरोग्य सेविका १ परिचर १ मुख्याध्यापक/शिक्षक २६ अशा एकूण ३१ कर्मचाऱ्यांना उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील व मुख्य लेखा वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांच्या हस्ते सेवानिवृत्तीच्या दिवशीच सेवानिवृत्ती आदेश प्रदान करण्यात आले यावेळी मीनाक्षी वाकडे यांनी मनोगत व्यक्त करताना माझे वडील सरकारी कर्मचारी होते त्यांचे सेवानिवृत्ती दिवशीच त्यांना सेवानिवृत्ती आदेश मिळाला होता त्यांच्या चेहऱ्यावर त्यावेळी मी आनंद पाहिला होता तोच आनंद आज तुमच्या सर्वांच्या चेहऱ्यावर बघत



आहे आपण केलेल्या चांगल्या कामाची ही पावती आहे सेवानिवृत्ती आदेश आज मी देऊ शकले त्याचा मला आनंद मनस्वी आनंद आहे विशेषता दयानंद परिचारक कनिष्ठ प्रशासन अधिकारी यांनी पुढाकार घेऊन सेवानिवृत्ती प्रकरणाचा निपटारा केलेला आहे याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन करते यापुढेही सेवानिवृत्ती दिवशीच आदेश देण्याचा माझा संकल्प राहील उपमुख्य कार्यकारी अधिकारी माननीय मा स्मिता पाटील यांनी अध्यक्ष मनोगत व्यक्त करताना अक्कलकोट तालुक्यातील अधिकारी सर्व कर्मचारी यांनी अतिशय चांगल्या प्रकारे काम केल्यामुळेच आज जिल्हा परिषदेच्या इतिहासात प्रथमताच एवढ्या मोठ्या प्रमाणात सेवानिवृत्तीच्या दिवशीच सेवानिवृत्ती आदेश देऊन मा आव्हाळे मॅडम यांनी केलेला संकल्प आपण सर्वांनी पूर्ण केलेला आहे.

## राज्यसेवा पूर्वपरीक्षा आता २१ जुलैला

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

६ जुलै रोजी होणारी राज्यसेवा पूर्वपरीक्षा आता २१ जुलै रोजी घेण्यात येणार आहे. ज्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या कुणबी अशा नोंदी सापडल्या आहेत. त्यांना ओबीसी प्रवर्गातून अर्ज करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे परीक्षेच्या तारखेत बदल करण्यात आला आहे. या संबंधित निवेदन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या वेबसाईटवरप्रसिद्ध करण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून वर्ग-१ आणि वर्ग-२ प्रवर्गातील एकूण ५२४ पदांसाठी ही परीक्षा घेण्यात येणार आहे. महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्वपरीक्षा २०२४ करिता ८ मे २०२४ च्या शुद्धिपत्रकानुसार एकूण ५२४ रिक्त पदांचा समावेशजाहिरातीमध्ये करण्यात आला असून अराखीव (खुला) अथवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील आरक्षणाचा लाभ घ्यावयाच्या असल्यास त्याबाबतचा विकल्प सादर करण्याची संधी देण्यात आली आहे. दरम्यान, काही उमेदवारांनी त्यांच्याकडील कुणबी नोंदीच्या आधारे इतर मागासवर्गाचे जात प्रमाणपत्र मिळाल्याचे नमूद करून महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा पूर्वपरीक्षा २०२४ करिता इतर मागास वर्गाचा विकल्प सादर करण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरून शासनाने अराखीव किंवा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी इतर मागास वर्गातून (ओबीसी) नव्याने अर्ज सादर करण्याची संधी दिली आहे.

# संपादकीय

## काहीच सोयरसुतक नाही....

आज बेरोजगारी, वाढती बेरोजगारी, बुडालेले उद्योग, पराकोटीची महागाई; महाग झालेले शिक्षण अशा अनेक मूलभूत प्रश्नांची चर्चाच होत नाही. निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मतप्रवाह वळवण्याचे मनसुबे जनता ओळखून आहे. सतत काही ना काही उपद्रव होईल, वादग्रस्त मुद्दे चर्चेत येतील व लोकांची शक्ती व्यर्थ खर्ची होईल, अशा घटना घडवत ठेवायचा निर्णय सत्ताधाऱ्यांनी घेतला आहे. मंगळसूत्र, म्हैस, मछली, राम मंदिर, मोदी की गॅरंटी, मुस्लिमांची वाढती लोकसंख्या, भटकती आत्मा, सॅम पित्रोडा, अदानी, अंबानी टेम्पो भरून काला धन काँग्रेसला देत आहे, अशा मुद्द्यांवर मतदारांची दिशाभूल केली जात आहे. सगळ्यात गंभीर म्हणजे हे मुद्दे स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे करत आहेत आणि पंतप्रधानपदाची प्रतिष्ठा लयाला घालवत आहेत. हुकूमशाही राज्यसत्तेचा विचार केल्यास असे दिसते की, शी जिनपिंग (चीन), व्लादिमीर पुतीन (रशिया), रेसेप एर्दोगान, या एकाकी नेत्यांच्या जोडीला मोदींचा गुणविशेष आता लपून राहिलेला नाही. उपरोल्लेखित एकाही नेत्याच्या देशात आर्थिक व सामाजिक व्यवस्था ठीकठाक नाही. सर्वांनी सत्तास्थान पटकावताच आपल्याला हवे तसे घटनात्मक बदल केले आणि विरोधकांचा आवाज असा दडपला की, ते पुन्हा उठणारच नाहीत. मोदीसुद्धा तसेच करत आहेत. कुठल्याही विशिष्ट व्यक्तीच्या, व्यक्तिसमूहाच्या आणि कुटुंबीयांच्या हाती प्रदीर्घ काळ सत्तेचे केंद्रीकरण हे त्या-त्या देशातील राज्यसंस्थेच्या ऱ्हासाचे कारण बनत असते. श्रीलंकेचे उदाहरण आपल्या समोरच आहे. अनिर्बंध सत्तेचा हव्यासच संबंधित व्यक्तीमधील विवेकाला मातीत गाडत असावा. आम्हाला धार्मिक टोळीत सक्रिय राहण्यात मजा वाटायला लागलीय का?, चुकीचा इतिहास जरी आमच्या ताटात कुणी वाढला तरी, त्याचे घास आपल्या मेंदूत भरण्यात आम्हाला मजा वाटायला लागलीय का? आपला भारत भविष्यात महान होणार आहे. विश्वगुरू होणार आहे, असे आम्ही निवडलेले सरकार बिंबवत आहे; पण तो कसा महान करणार आहात? हे विचारण्याची तीळभरही हिंमत आमच्यात नाही किंवा एक तर आमची बुद्धीच चालत नाही. भारतात पूर्वी किती भ्रष्टाचार होता आणि मागील ७० वर्षांत कसं काहीच झालेलं नाही आणि आता मात्र या सरकारने मागील दहा वर्षात भारताला कसं सोने की चिडिया केलेला आहे अशा काल्पनिक विकासाच्या गोष्टी ऐकून रात्री झोप यायला लागली आहे, याच झोपेत आमचा देश भांडवलदारांना आंदण देऊन टाकला असून आम्हाला त्याचे काहीच सोयरसुतक नाही.

पान १ वरुन

### मध्य,ईशान्य आणि उत्तर ..

सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. सामान्य तापमानापेक्षा यामध्ये ५.२ सेल्सिअसची अधिक भर आहे. राजधानी दिल्लीमध्ये पहिल्यांदाच ७९ वर्षांचा उच्च तापमानाचा विक्रम यानिमित्ताने मोडीत निघाला आहे.बिहारमध्ये सर्वाधिक ३२ लोक उष्माघातमुळे मरण पावले आहेत. बिहारच्या औरंगाबाद जिल्ह्यात १७, अराहमध्ये ६, गया आणि रोहतसमध्ये प्रत्येकी तीन, बक्सर आणि पाटणा येथे प्रत्येकी एकाचा मृत्यू झाला. ओडिशामधील रुरकेला येथे १० जणांचा मृत्यू झाला. झारखंड आणि राजस्थानमध्ये प्रत्येकी पाच जणांचा मृत्यू झाला. तर उत्तर प्रदेशच्या सुलतानपूरमध्ये एक व्यक्तीचा मृत्यू झाला.

दरम्यान बिहारमधील ४० वर्षीय व्यक्तीचा दिल्लीत उष्माघातामुळे मृत्यू झाला. या व्यक्तीच्या शरीराचे तापमान १०८ अंश फॅरेनहाइट पर्यंत पोहोचले होते, त्यामुळे त्याच्या शरीरातील एक - एक अवयव निकामी होत गेला. शरीराच्या साधारण तापमानापेक्षा हे तापमान १० अंशांनी अधिक होते.गुरुवारी राजस्थान, हरियाणा, चंदीगढ, दिल्ली या राज्यातील तापमान ४५ ते ४८ अंश सेल्सिअसपर्यंत गेलेले पाहायला मिळाले, असे हवामान खात्याने सांगितले. पश्चिम मध्य प्रदेश, छत्तीसगड, आंध्र प्रदेशचा किनारपट्टीचा भाग, येणम आणि गुजरातमधील काही भागात ४२ ते ४५ डिग्री सेल्सिअसपर्यंत तापमान असल्याचे निदर्शनास आले. नेहमीपेक्षा हे तापमान ३ ते ६ अंशांनी अधिक असल्याचे दिसले.यापुढे म्हणजे ३१ मे ते १ जूनपर्यंत पंजाब, हरियाणा, चंदीगड, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड आणि ओडिशा या राज्यात मोठ्या प्रमाणात उष्णतेचा कहर दिसून येणार असल्याचेही हवामान विभागाने सांगितले आहे.

### 'एअर इंडिया'च्या विमानाला ३०..

हे बोईंग ७७७ विमान ११ वाजता उड्डाण करणार होते. मात्र, त्यामध्ये बदल होऊन त्याची वेळ दुपारी तीन वाजता निर्धारित करण्यात आली. त्यालाही पुढे उशीर होऊन संध्याकाळी ५.४५ वाजता विमान उड्डाण करेल असे सांगण्यात आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानाने त्यानंतरही उड्डाण केलेच नाही. होणाऱ्या उशिरासाठी आधी तांत्रिक बिघाड असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला, त्यानंतर पेलोडची समस्या असल्याचे लक्षात आले. या सगळ्या गोंधळात लहान मुलांचे आणि वृद्ध प्रवाशांचे प्रचंड हाल झाले.

# मलेशिया महाराष्ट्राशी व्यापार, पर्यटन, विज्ञान तंत्रज्ञान देवाणघेवाण वाढविण्याबद्दल उत्सुक : दातो मुजफ्फर शाह मुस्तफा

**मुंबई /दैनिक यशसिध्दि न्यूज**

मलेशिया आणि भारताचे संबंध पूर्वीपासून घनिष्ठ व सहकार्याचे असून येत्या तीन वर्षात उभय देशांमधील व्यापार २० अब्ज डॉलरवरुन २५ अब्ज डॉलर इतका वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. आगामी काळात मलेशिया भारताशी पर्यटन, विज्ञान व तंत्रज्ञान, क्रीडा व पाम लागवड या क्षेत्रात सहकार्य वाढविणार असून या दृष्टीने महाराष्ट्र हे राज्य मलेशियाकरिता सर्वात महत्त्वाचे असेल, असे प्रतिपादन मलेशियाचे भारतातील नवनियुक्त उच्चायुक्त दातो मुजफ्फर शाह मुस्तफा यांनी येथे केले.

मुजफ्फर शाह मुस्तफा यांनी गुंतवणूक, व्यापार व पर्यटन विषयक मलेशियाच्या शिष्टमंडळासह गुरुवारी (दि. ३०) राज्यपाल रमेश बैस यांची राजभवन मुंबई येथे भेट घेतली त्यावेळी ते बोलत होते.

मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम लवकरच भारतभेटीवर येण्याची शक्यता असून आपल्या दौऱ्यात ते मुंबईला देखील भेट देण्याची शक्यता असल्याचे मुस्तफा यांनी सांगितले. मलेशियाला सेमीकंडक्टर निर्मितीचा ५० वर्षांचा अनुभव असून मलेशिया - भारत डिजिटल सहकार्य परिषदेच्या माध्यमातून डिजिटल अर्थव्यवस्था तसेच सेमीकंडक्टर निर्मिती क्षेत्रात मलेशिया भारत सहकार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले.मलेशिया भारतीयांना आगामी वर्षभर आगमनानंतर विजा देत असून भारताने देखील मलेशियातून येणाऱ्या नागरिकांना आल्याबरोबर विजा उपलब्ध करून द्यावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



भारतातून मलेशियाला गेल्यावर्षी ७ लाख पर्यटक आले असून यंदा त्याहून अधिक पर्यटक येणे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. या दृष्टीने मलेशियन मुंबई, दिल्ली व चेन्नई येथे पर्यटन कार्यालये उघडली असल्याचे त्यांनी सांगितले. मलेशिया वेडिंग डेस्टिनेशन, गोल्फ या दृष्टीने भारतीय पर्यटकांना आकर्षित करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

पाम तेलाबाबत गैरसमज दूर करणार

मलेशिया भारताला ३० लक्ष टन पामोलिन तेल निर्यात करीत आहे. पामोलिन हे खाद्य तेल असले तरीही या तेलाबाबत लोकांच्या मनात काही गैरसमज आहेत असे सांगून ते दूर करून पाम तेल आरोग्यासाठी चांगले आहे हे पटवून देण्यासाठी मलेशिया प्रयत्न करीत असल्याचे उच्चायुक्त मुस्तफा यांनी सांगितले.जगाची लोकसंख्या वाढत असताना पाम तेलांमुळेच लोकसंख्येची खाद्य तेलाची गरज पुरी होऊ शकते,असे त्यांनी सांगितले. एक हेक्टर क्षेत्रफळातून तीस वर्षे ८ टन पाम तेलाची निर्मिती होत असल्यामुळे पाम लागवड शेतकऱ्यांसाठी देखील लाभदायक असल्याचे त्यांनी सांगितले.

भारताने नवीन परराष्ट्र व्यापार नीती जाहीर केली असून मलेशियाने भारताशी पारंपरिक क्षेत्रांशिवाय डिजिटल अर्थव्यवस्था, अक्षय ऊर्जा, सेमीकंडक्टर निर्मिती व स्टार्टअप क्षेत्रात देखील सहकार्य वाढावे अशी अपेक्षा राज्यपालांनी यावेळी व्यक्त केली. भारत जगाचे औषध निर्मिती स्थळ म्हणून उदयास आले असून उभय देशांनी जेनेरिक औषध निर्मिती, वॅक्सीन विकास व आरोग्य कर्मचाऱ्यांची गतिशीलता या क्षेत्रात देखील सहकार्य वाढावे असे राज्यपालांनी सांगितले. बैठकीला मलेशियाचे मुंबईतील वाणिज्यदूत अहमद झुवैरी यूसोफ तसेच गुंतवणूक, पर्यटन व व्यापार विषयक कार्यालयांचे भारतातील प्रतिनिधी उपस्थित होते.

### देशातील सर्वोत्तम संचालनालय होण्याचा बहुमान; महाराष्ट्र एनसीसीला 'राज्यपालांचे प्रशस्तीपत्र' प्रदान

# एनसीसी प्रशिक्षणामुळे समाजाप्रती जबाबदार नागरिक घडतात : राज्यपाल

**मुंबई /दैनिक यशसिध्दि न्यूज**

एनसीसीमध्ये विद्यार्थ्यांवर देशभक्ती, शिस्त व समाजसेवेचे संस्कार घडतात. सर्वांकरीता एनसीसी प्रशिक्षण अनिवार्य झाले तर ती खरोखरच चांगली गोष्ट होईल. एनसीसी प्रशिक्षणामुळे समाजाप्रती जबाबदार नागरिक घडतात, असे प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी आज येथे केले.




राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) महाराष्ट्र संचालनालयाला सर्वोत्कृष्ट संचालनालय ठरल्याबद्दल राज्यपाल बैस यांच्या हस्ते गुरुवारी (दि. ३०) राजभवन येथे 'राज्यपालांचे प्रशस्तीपत्र' समारंभपूर्वक प्रदान करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. राजभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या 'प्रशस्तीपत्र प्रदान सोहळ्यात' राज्यपालांच्या हस्ते महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल योगेंदर सिंह यांना प्रशस्तीपत्र देण्यात आले. आपण स्वतः एनसीसी कॅडेट होतो असे नमूद करून देशातील शाळा तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिस्तीचे महत्व जाणवले, तर देश अतिशय वेगाने प्रगती करेल, असे राज्यपालांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाने आजपर्यंत २३ वेळा पंतप्रधानांचे ध्वजनिशान जिंकले. तसेच ८ वेळा महाराष्ट्र संचालनालय उपविजेते ठरले आहे, याबद्दल राज्यपालांनी राज्यातील एनसीसीच्या सर्व अधिकारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एनसीसी कार्यरत असून एकूण १.१७ लाख कॅडेट्स कार्यरत आहेत. पुढील १० वर्षांत कॅडेट्सची राज्यातील संख्या १.८५ लाख इतकी वाढविली जाणार आहे, हे कौतुकास्पद आहे असे राज्यपालांनी सांगितले.

एनसीसी प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी निवडलेल्या क्षेत्रात काम करताना राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे असे आवाहन राज्यपालांनी विद्यार्थ्यांना केले. या सोहळ्याला भारतीय सैन्यदलातील वरिष्ठ अधिकारी, शासनाचे अधिकारी, विद्यापीठांचे कुलगुरु तसेच विविध महाविद्यालयांमधील एनसीसीचे कॅडेट्स उपस्थित होते. यावेळी एनसीसीच्या चमूने एक रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला.

### एसटीचा ७६ वा वर्धापन दिन..

झालेला हा प्रवास ७६ वर्षांत १५ हजार बसपर्यंत पोहोचला आहे. या बसच्या माध्यमातून ५६० पेक्षा जास्त बस स्थानकांवरून दररोज सरासरी ५५ लाख प्रवाशांची वाहतूक करण्यात येत आहे.७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक, महिला, दिव्यांग, शालेय विद्यार्थी - विद्यार्थीनी अशा ३० पेक्षा जास्त समाज घटकांना एसटीच्या प्रवासी सेवेमध्ये ३३ टक्क्यांवरून १०० टक्क्यांपर्यंत शासनाद्वारे सवलत दिली जाते. याबरोबरच गणेशोत्सव, दिवाळी, आषाढी, कार्तिकी यात्रा अशा अनेक सण आणि उत्सवाच्या निमित्ताने नियमित फेऱ्यांबरोबरच विशेष फेऱ्या चालवून, एसटी सर्व सामान्य प्रवाशांबरोबरच भाविक प्रवाशांची सोय करते. तसेच शालेय सहली, लग्न समारंभ, विविध शासकीय महोत्सव, मेळावे यासाठी देखील एसटी सेवा पुरवीत आहे. गेली ७६ वर्षे प्रवाशांचे प्रेम आणि विश्र्वासार्हता या शिदोरीवर एसटी 'महाराष्ट्राची लोकवाहिनी' बनली आहे. भविष्यातही प्रवाशांना दर्जेदार सेवा देण्याच्या दृष्टीने एसटी कटिबध्द राहील, अशी ग्वाही देत, लाखो प्रवाशांना एसटीच्या वतीने उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी शुभेच्छा दिल्या.

### पंढरीच्या विठ्ठल मंदिरात आढळले..

अचानक एक दगडी फरशी खाली दबली गेली. त्यामुळे बांधकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी ती दबलेली दगडी फरशी बाजुला करुन पाहणी केली असता त्या खाली भुयार किंवा तळघर असल्याचे दिसून आले. त्यामुळे त्या भागातील दगडी फरशी काढण्याचे काम त्वरित थांबवून माहिती पुरातन विभागाला देण्यात आली. दरम्यान पुरातन विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहणे व वास्तुविशारद तेजस्वीनी आफळे या पाहणीसाठी पंढरपूरात दाखल झाल्या. येथील विठ्ठल मंदिरात सायंकाळी येवून ते मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज ओसेकर, पंढरपूरातील काहीज्येष्ठ महाराज मंडळी, विठ्ठल मंदिरा बाबत जाणकार मंडळी आदींची अगोदर बैठक होवून सर्वांच्या उपस्थितीत मंदिरातील या भुयार किंवा तळघराची पाहणी करण्यात आल्याचे माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# शेवटच्या टप्प्यातील मतदानापूर्वी मनमोहन सिंग यांचे जनतेला उद्देशून पत्र

**नवी दिल्ली/दैनिक यशसिध्दि न्यूज**

येत्या १ जून रोजी लोकसभा निवडणुकीच्या सातव्या टप्प्यातील मतदान पार पडणार. यामध्ये पंजाबमधील १३ जागांसह ८ राज्यातील एकूण ५७ जागांसाठी मतदान होणार आहे. दरम्यान, शेवटच्या टप्प्यातील मतदानापूर्वी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी जनतेला उद्देशून एक पत्र लिहिलं आहे. या पत्रात त्यांनी उज्ज्वल भविष्यासाठी काँग्रेसला मतदान करावे, असं आवाहन केलं आहे. तसेच लोकशाही वाचवण्याची ही शेवटची संधी आहे, असं म्हणत त्यांनी मोदी सरकारवर टीकाही केली आहे.

येत्या १ जून रोजी देशात सातव्या टप्प्याचे मतदान पार पडणार आहे. देशातील लोकशाही वाचवण्याची ही शेवटची संधी आहे. जनतेने या संधीचा फायदा घ्यावा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यांसाठी काँग्रेसला मतदान करावे, असं आवाहन मनमोहन सिंग यांनी पत्राच्या माध्यमातून केलं आहे. या पत्रात त्यांनी अर्थव्यवस्थेच्या मुद्यावरून मोदी सरकारवर टीकाही केली आहे. नोटबंदीचा चुकीचा निर्णय, चुकीच्या पद्धतीने लागू करण्यात आलेला जीएसटी आणि करोना काळातील चुकीचं व्यवस्थापन यामुळे देशाची अर्थव्यवस्था कमजोर झाली आहे. भाजपा सरकारच्या काळात जीडीपीचा दर ६ टक्क्यांच्याही खाली गेला आहे. यूपीए सरकारच्या काळात हा दर ८ टक्के इतका होता. देशात बेरोजगारी आणि महागाई मोठ्या प्रमाणात वाढली आहे, असे ते म्हणाले.पुढे या पत्रात त्यांनी अग्नीवीर योजनेवरूनही मोदी सरकारला लक्ष्य केलं आहे. मोदी सरकारने सशस्त्र दलांसाठी अग्नीवीर योजना आणली. भाजपाला वाटते की देशभक्तीचं मुल्य केवळ ४ वर्ष आहे. यावरून भाजपा मनातील पोकळ देशभक्ती दिसून येते, अशी टीका त्यांनी केली. मनमोहन सिंग यांनी या पत्राद्वारे शेतकऱ्यांच्या मुद्यावरून मोदी सरकारला घेरण्याचा प्रयत्न केला आहे. काही वर्षांपूर्वी शेतकऱ्यांनी कृषी कायद्याविरोधात आंदोलन केल होते. यात जवळपास ७५० शेतकऱ्यांचा मृत्यू झाला होता. यापैकी अनेक जण पंजाब आणि शेजारच्या राज्यातील होते. निर्दयी मोदी सरकारने आपल्या शेतकऱ्यांवर लाठीचार्ज केला. तसेच त्यांच्यावर अश्रूगोळे फेकले. पंतप्रधान मोदी यांनी २०२२ साली शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे आश्र्वासन दिले होते. परंतू तसे झाले नाही. याउलट गेल्या १० वर्षातील चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले, असे ते म्हणाले.

# विधिमंडळ कामकाजाबाबत मंत्रालयात तीन जूनला कार्यशाळा

**मुंबई /दैनिक यशसिध्दि न्यूज**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत 'माध्यम साक्षरता अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार तसेच महासंचालनालयातील अधिकारी यांच्याकरिता 'ओळख विधिमंडळ कामकाजाची' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन सोमवार, दि. ३ जून २०२४ रोजी मंत्रालयातील वार्ताहर कक्षात करण्यात आले आहे.या कार्यशाळेत विधानपरिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधिमंडळ सचिवालयाचे निवृत्त प्रधान सचिव अनंत कळसे, विधिमंडळ सचिवालयाचे प्रधान सचिव जितेंद्र भोळे हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेच्या प्रथम सत्रात विधिमंडळाची कार्यपद्धती आणि संकल्पना या विषयावर प्रधान सचिव श्री.भोळे, द्वितीय सत्रात विधिमंडळ कामकाजाचे वृत्तांकन, चर्चा आणि विशेषाधिकार या विषयावर निवृत्त प्रधान सचिव श्री.कळसे तर तृतीय सत्रात विधिमंडळ कामकाजात आमदारांची भूमिका, विधिमंडळ समिती कामकाज व दस्तऐवज या विषयावर विधानपरिषद उपसभापती डॉ. गोऱ्हे मार्गदर्शन करतील.विधिमंडळ अधिवेशन कामकाजाचे वार्तांकन करताना माध्यम प्रतिनिधींना ही कार्यशाळा मार्गदर्शक ठरणार आहे. कार्यशाळेतील मार्गदर्शनाचा उपयोग अधिवेशन कामकाजाचे वार्तांकनासाठी करावा, असे आवाहन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक ब्रिजेश सिंह, विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष प्रमोद डोईफोडे यांनी केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# काँग्रेसच्या उपोषणामुळे प्रशासन हादरले मागणी मान्य करून उपोषणास स्थगिती

## काँग्रेस कार्यकर्त्यांच्या उपोषणाला काँग्रेस नेत्यांची गैरहजेरी.इतर पक्षीय नेत्यांचा पाठींबा



**✻ नळ पाणीपुरवठ्याचे काम सुरू करून लवकरात लवकर पूर्ण करू ✻ गुरांच्या दवाखान्याजवळ पाईपलाईनमध्ये पाणी टाकून पाणी पुरवठा करू ✻ पाण्याचे टँकर वाढविणार, ग्रामपंचायत टँकर भाड्याने घेऊन पाणी पुरवठा करणार ✻ गावातील नालेसफाईचे कामही तातडीने सुरू करणार.**

**बुलढाणा/राहुल साबळे**

सिंदखेडराजा तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या दुसरबीड येथे पिण्याच्या पाण्यासाठी राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. तसेच, काल ग्रामस्थांनीदेखील गाव कडकडीट बंद ठेवून या उपोषण आंदोलनाला पाठिंबा दिला होता. ग्रामस्थांचा वाढता रेटा आणि उपोषणकर्त्यांची आक्रमक भूमिका पाहाता, सरपंचांसह ग्रामपंचायत प्रशासन चांगलेच हादरले असून, आज (दि.३०) उपोषणकर्त्यांना लेखी आश्र्वासन देत उपोषण सोडण्याची विनंती करण्यात आली. या मागणी पूर्ण न झाल्यास पुन्हा उपोषण सुरू केले जाईल, असा इशारा देत उपोषणकर्त्या सामाजिक व राजकीय नेते, कार्यकर्त्यांनी आजअखेर आपले उपोषण मागे घेतले आहेत.

**ग्रामपंचायतीने दिलेले लेखी आश्वासन** उपोषणकर्त्यांना दिलेल्या लेखी आश्र्वासनांत नळ पाणीपुरवठ्याचे काम सुरू करून लवकरात लवकर पूर्ण करू, गुरांच्या दवाखान्याजवळ पाईपलाईनमध्ये पाणी टाकून पाणी पुरवठा करू, पाण्याचे टँकर वाढविणार असून, ग्रामपंचायत टँकर भाड्याने घेऊन पाणी पुरवठा करणार आहे. तसेच, गावातील नालेसफाईचे कामही तातडीने सुरू करणार असल्याचे लेखी स्वरूपात देण्यात आलेले आहे. काल ग्रामस्थांनी कडकडीट बंद पाळला होता. तसेच, गावातील व्यापारीवर्गानेदेखील या बंदला उत्स्फुर्त पाठिंबा दिला होता. त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासन चांगलेच हादरले होते. या उपोषण आंदोलनात काँग्रेसचे स्थानिक नेते जुनेद अली, सुनील जायभाये, गजानन जायभाये, शैदाद पठाण, अर्जुन घुगे, हलीमखा पठाण, पांडुरंग वाघ आदी सहभागी झाले होते. तर उपोषण सुटतेवेळी डॉ. शिंदे, कचरूजी बारस्कर, रहेमान शेख, प्रभाकर ताठे, प्रकाश सांगळे, दिलीप देशमुख, प्रकाश केवट, कौसर काजी, शेख अनीस, जाकेर पठाण, साबीर पठाण, तन्वीर फौजी, कडुबा पवार, सुरज कुटे, बबन कुटे, कडुबा पवार, एकनाथ सरवदे, बबन बरांडे, उमर टेलर, इमाम शेख, सचिन घुगे, अदीम पठाण, शेख शकील मिस्त्री, शेख हनीफ, फारूख भाई निजाम, मास्टर शेख, शेख सत्तार, शेख बिलाल, शेख लतिफ, बबन नाळे, संजय पवार, संजय खेत्रे, जुनेद टेलर,, शेख अख्तर, अख्तर भाई, लक्षण सांगळे, शिवनारायण सांगळे, अनीलभाऊ सांगळे, सांगळे आदी उपस्थित होते.

# अक्कलकोट रिपाइं तर्फे जितेंद्र आव्हाड याच्या मिशा कामणाऱ्याला विशेष बक्षीस जाहीर



**अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी**

भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची विटंबना जितेंद्र आव्हाड यांनी केल्याबद्दल त्यांच्या एक साईडचे मिशा कापणार्यास विषेश बक्षीस जाहीर केली आहे. अक्कलकोट येथे रिपाइं (आठवले गट) च्या जोडे मारो व पुतळा दहन आंदोलन करण्यात आले होते. यावेळी जितेंद्र आव्हाड यांचे मिश्या कापणाऱ्याला ६ हजर ६६६ रुपये बक्षीस देऊन सत्कार करण्यात येणार असल्याचे घोषणा रिपब्लिकन पक्षाच्यावतीने करण्यात आली आहे. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री मा.ना रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली,महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष लोकनेते राजाभाऊ सरवदे साहेब यांच्या आदेशांने ही आंदोलन ठेवण्यात आली होती. सदर आंदोलन तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे व शहर अध्यक्ष अजय मुकणार यांच्या नृेत्वाखाली करण्यात आली आहे.याप्रसंगी रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी,युवक आघाडी जिल्हा सरचिटणीस विजयकुमार पोतेनवरु,राहुल रुही,ता सचिव राजु भगळे,ता उपाध्यक्ष चंद्रकांत गायकवाड,शहर सचिव शुभम मडिखांबे,यु आ ता उपाध्यक्ष कृष्णा धोडमनी,उत्तम गायकवाड,दुधनी शहर अध्यक्ष गोरखनाथ धोडमनी,विलास गायकवाड,सुर्यकांत सोनकांबळे,आंदेवाडीचे सरपंच रमेश धोडमनी, रोमीत मडिखांबे,उमेश शिवशरण, राजशेखर गायकवाड,भीमा मडिखांबे, अनील नाटेकर,लहू गायकवाड, अंबादास बनसोडे, अंबादास शिंगे,अजय मडिखांबे, शिवानंद मडिखांबे, सुरेश गायकवाड,रवी सलगरे, राजकुमार गवळी, महमूद शेख, दस्तिगिर मुजावर,बंटी मडिखांबे आदी सह ईतर तालुका व शहर चे पदाधिकारी व सर्व आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी एवन चौक अक्कलकोट येथील हुतात्मा स्तंभ येथे उपस्थित होती.

# अन्नछत्र मंडळाच्या ओजस्वी कार्याची कक्षा उंचावत असून, ही स्वामींची इच्छा : आर्या आंबेकर

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अन्नछत्र मंडळाच्या ओजस्वी कार्याची कक्षा उंचावत असून, ही स्वामींची इच्छा, आशीर्वाद, कृपादृष्टी असल्याचे मनोगत ख्यातनाम गायिका आर्या आंबेकर यांनी व्यक्त केल्या.



त्या श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहपरिवार आल्या असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या.

याप्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्र्वस्त संतोष भोसले, लेखापरीक्षक ओंकारेश्र्वर उटगे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, निखील पाटील, एस.के.स्वामी, नामा भोसले, सतीश महिंद्रकर, अभियंता अमित थोरात, दत्ता माने, राजू पवार, गोटू माने, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगणुर, शिवकुमार स्वामी, विश्र्वनाथ कलशेट्टी, प्रसाद हुल्ले, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, लाला निंबाळकर, देवराज हंजगे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# ईटकुर येथे अहिल्यादेवी होळकर यांची जयंती मोठया उत्सवात साजरी

**ईटकुर/सुधाकर रणदिवे**

कळंब तालुक्यातील ईटकुर येथे पुण्यशलोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती मोठया उत्सवात साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष स्थानी ईटकुर गावचे नागरिक वैजिनाथ वाघमारे गुरुजी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन सामाजिक कार्यकर्ते सचिन गंभीरे व शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरिदास दादा पावले हे होते, या १० वी मध्ये पहिला, दुसरा व तिसरा क्रमांक आलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. या वेळी पुण्यशलोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती प्रत्येक खाजगी/शासकिय कार्यालायात साजरी करण्यात यावी यासाठी सर्व कार्यालयांना अहिल्याबाई होळकर यांची प्रतिमा भेट म्हणुन देन्यात आली. तसेच हे गाव हरित क्रांती असल्यामुळें गावांतील सर्व झाडांना पाणी देण्यात आले. या कार्यक्रमाला गावच्या सरपंच मोहराताई कस्पटे, पंचायत समितीचे माजी उपाध्यक्ष लक्ष्मण काका अडसूळ, वल्लभ पोते, अभयसिंह अडसूळ, सचिन गंभीरे, पत्रकार सुधाकर रणदिवे, मधुकर अडसूळ, धम्मचारी समंत बंधू,जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सतिश कस्पटे, गणेश गिरे, आकाश दाने, नवनाथ गायके, संतोष कस्पटे, बालाजी घाटूळे, केशव कस्पटे, श्रीराम वाघमारे, दत्ता दाने, हा जयंती उत्सव कार्यक्रम पत्रकार अजित गायके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला. या कार्यक्रमासाठी गावातील सर्व प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होते.



# श्रीक्षेत्र बोरी उमरगे येथील ग्रामदैवत श्री लक्ष्मी देवी यात्रा पाच जूनपासून सुरू

**अक्कलकोट/प्रतिनिधी**



तालुक्यातील श्रीक्षेत्र बोरी उमरगे येथील ग्रामदैवत श्री लक्ष्मी देवी यात्रा महोत्सव निमित्ताने बुधवारी दि.५ ते ७ जून पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामदैवत श्री लक्ष्मी देवी यात्रा महोत्सव निर्मिती गावकरी कडून जय्यत तयारी करण्यात येत आहे. बुधवार दि.५ रोजी सायंकाळी कळसा रोहण कार्यक्रम होणार आहे. गुरुवार दि. ६ रोजी अमवाशा दिवशी दिवसभर गी गी पदाचे कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी श्री लक्ष्मी देवी देवस्थान पासून श्री हनुमान देवालय मार्गे श्री बसवेश्र्वर देवस्थान पर्यंत फटाक्यांचे आतषबाजी करीत विविध वाद्य समवेत श्रींचे भव्य पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. यानंतर रात्री १० वाजता सुंदर सामाजिक कन्नड नाटकांचे आयोजन करण्यात आले असून या नाटकांचे उद्घाटन बसवराज बिराजदार गुजरात यांचे हस्ते होणार आहे. शुक्रवार दि.७ रोजी पहाटे पाच वाजता श्रींचे महाअभिषेक पूजा कार्यक्रम होणार असून दिवसभर गी गी पदाचे कार्यक्रम होणार आहे.सायंकाळी पाच वाजता जंगी पैलवानाचे कुस्त्याची खेळ होणार आहे. रात्री १० वाजत ताळी हरीलीला,शिल उळीलीला या सुंदर सामाजिक कन्नड नाटकांचे आयोजन करण्यात आले असून या नाटकांचे उद्घाटन माजी सरपंच पंडित पाटील यांचे हस्ते होणार आहे.

# वृत्तपत्र खरेदी करणार्यांना आयकरात सुट मिळावी याबाबत विचार करू : नितीन गडकरी

## ■ पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप शेंडे यांच्या शिष्टमंडळाला ग्वाही ■

**नागपूर/प्रतिनिधी**

लोकसभा निवडणूकीत भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहूमत मिळणार असून सरकार स्थापन झाल्यानंतर राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केंद्र सरकारकडे केलेली वृत्तपत्र खरेदी करणार्यांना वार्षिक पाच हजार रूपयाची उत्पन्न करात सुट द्यावी ही मागणी आपण संसदेच्या सभागृहात मांडू आणि सकारात्मक निर्णय होईल अशी ग्वाही नागपूर लोकसभा मतदार संघातील भाजपचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी पत्रकार संघाच्या शिष्टमंडळाला दिली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांना वृत्तपत्र आणि पत्रकारांच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले. नागपूर पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदिप शेंडे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेवून पत्रकार संघाचे निवेदन आणि माहितीपुस्तिका देवून चर्चा केली. यावेळी नितीन गडकरी म्हणाले, ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न, वर्तमानपत्रांच्या समस्या आपल्याला माहित आहेत. भारतीय जनता पार्टीचे सरकार स्थापन होणार आहे. त्यानंतर संसदेच्या सभागृहात वृत्तपत्रांच्या मागणीसंदर्भात आपण पुढाकार घेवू राज्य पत्रकार संघाने वृत्तपत्र खरेदी करणार्यांना उत्पन्न करात वार्षिक पाच हजाराची सुट द्यावी ही मागणी वृत्तपत्र व्यवसायाला बुस्टर डोस ठरणार आहे. प्रदेश सरचिटणीस विश्वास आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली शिष्टमंडळाने नागपूर विभागातील विविध पक्षाच्या उमेदवारांना निवेदन देवून पत्रकारांच्या प्रश्नाकडे प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांचे लक्ष वेधले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप शेंडे यांच्यासह सरचिटणीस अंकुश डाखोरे, संघटक मोहम्मद इलियास व इतर पदाधिकारी उपस्थित होते.




# माळशिरस येथे जोडे मारो आंदोलन

**माळशिरस/प्रतिनिधी:**

पुरोगामीकत्वाचे नकली घोंगडं पांघरून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान करणाऱ्या शरदचंद्र पवार गट राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी बाबासाहेबांचे चित्र फाडण्याचे जे कृत्य केले याचा आम्ही निषेध करीत असल्याचे सांगून भाजप किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सरगर यांनी आव्हाड यांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन केले.



भाजपच्यावतीने माळशिरस येथे आव्हाड यांच्या विरोधात आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना सरगर यांनी, भारतीय जनता पक्षावरती मनुस्मृतीच्या नावाखाली अनेक आरोप आव्हाड हे करीत आहेत. यापूर्वी त्यांनी प्रभू रामचंद्रांविषयी वादग्रस्त विधान करून हिंदू धर्माच्या भावना दुखावल्या होत्या. सातत्याने हिंदू धर्माचा द्वेष करणाऱ्या आव्हाड यांच्या फोटोला जोडे मारो आंदोलन केले असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा सहप्रभारी के. के. पाटील, किसान मोर्चा प्रदेश सचिव सोपान नारनवर, युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष आकाश सावंत, नगरसेवक आबा धाइंजे, मतीन बिद्रे, किसान मोर्चा चिटणीस ज्ञानेश्वर तरंगे, लखन सावंत, यशवंत मोहिते, अमोल वाघमोडे, जॉन्टी शिंदे, गणेश सिद, हर्षद धाइंजे, अभिजित सावंत, गौतम धाइंजे, किरण सावंत, गणेश भोसले, रवी खरात, विनोद सावंत आदी उपस्थित होते.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचा, प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी इच्छुक संस्थेने प्रस्ताव सादर करावेत

सोलापूर/प्रतिनिधी : साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्यावतीने प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी संस्थेची निवड केली जाणार आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील कौशल्य विकास व उद्योजकता प्रशिक्षण पोर्टलवर नोंदणी केलेल्या संस्थांनी आपला प्रस्ताव दि ३० जून, २०२४ पर्यंत सोलापूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता येथील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयात सादर करावा, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर.एच. चव्हाण यांनी केले आहे. साहित्यरत्न लोकशाहिर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील कुटुंबाचे सामाजिक आर्थिक व शैक्षणिक उन्नती व्हावी, त्यांना रोजगार व स्वंयरोजगाराची साधने उपलब्ध व्हावी, यासाठी समाजातील गरजूंना आवश्यक त्या व्यवसायाचे प्रशिक्षण देवून त्यांना उपजिविकेचे साधन उपलब्ध होण्यासाठी प्रशिक्षण योजना राबविण्यात येत आहे. सोलापूर जिल्हा कार्यालयास सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता एकूण ५०० प्रशिक्षणार्थींना कौशल्य विकास उद्योजकता प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट प्राप्त झालेले आहे. प्रशिक्षणार्थीने निवडलेल्या प्रशिक्षणाची फी कौशल्य विकास व उद्योजक विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे अदा केली जाणार आहे.

प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर शासनाच्या नियमानुसार आवश्यक त्या परीक्षेला बसविण्याची जबाबदारी संस्थाचालकाची राहील, त्याशिवाय संस्थेची फी दिली जाणार नाही. प्रशिक्षण संस्थेला प्रशिक्षण कालावधीनुसार टप्प्या- टप्प्याने प्रशिक्षण फी अदा करण्यात येईल. तरी इच्छुक संस्था चालकांनी आपला प्रस्ताव ३० जून २०२४ पर्यंत सादर करावेत. यातारखेनंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत, असे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर.एच चव्हाण यांनी कळविले आहे.

# निवृत्तीवेतनधारकांनी ऑनलाईन रक्कम भरण्यासाठी येणाऱ्या संदेशाबाबत सावध रहा : लेखा व कोषागारे संचालनालयाचे आवाहन

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई आणि राज्यातील सर्व जिल्हा कोषागार कार्यालयांमधून निवृत्तीवेतनधारक, कुटुंबनिवृत्तीवेतनधारकांना निवृत्तीवेतन, सुधारित निवृत्तीवेतन, कुटुंबनिवृत्तीवेतन तसेच निवृत्तीवेतन विषयक इतर लाभ प्रदान करण्यात येतात. सदर लाभ प्रदान करताना कोणत्याही प्रकारे वसुलीबाबत, प्रदान करण्यात येणाऱ्या रकमेबाबत कोषागार कार्यालयामार्फत फोन करून संपर्क साधला जात नाही. तसेच ऑनलाईन व्यवहार करण्याविषयी सूचित केले जात नाही. अधिदान व लेखा कार्यालय, कोषागार कार्यालयांमार्फत फक्त लेखी स्वरूपात पत्रव्यवहार केला जातो. अशा येणाऱ्या संदेशाबाबत सावध राहून कुणीही प्रतिसाद देऊ नये, असे आवाहन लेखा व कोषागारे संचालनालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

याबाबत काही निवृत्तीवेतनधारकांना दूरध्वनी, भ्रमणध्वनीद्वारे ऑनलाईन रक्कम भरल्यानंतर कोषागारांतील थकीत रक्कम मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. याबाबतच्या तक्रारी कोषागार कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. अशा कोणत्याही प्रकारचा दूरध्वनी अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालयांमार्फत केला जात नाही. तसेच कार्यालयातील कर्मचाऱ्यास निवृत्तीवेतनधारकांच्या घरी पाठविले जात नाही.दूरध्वनी, भ्रमणध्वनीवरून प्रदानासंदर्भात संपर्क साधून रक्कम ऑनलाईन, गुगल पे, फोन पे किंवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे भरणेबाबत अधिदान व लेखा कार्यालय तसेच जिल्हा कोषागार कार्यालयांमार्फत कळविले जात नाही. अशा दूरध्वनी, भ्रमणध्वनीला प्रतिसाद देऊन निवृत्तीवेतनधारकांनी परस्पर रक्कम भरल्यास ती निवृत्तीवेतनधारकांची वैयक्तिक जबाबदारी राहील, याची नोंद घ्यावी.

तसेच अशा प्रकारचा दूरध्वनी प्राप्त झाल्यास कृपया आपण निवृत्तीवेतन घेत असलेल्या अधिदान व लेखा कार्यालय अथवा जिल्हा कोषागार कार्यालयास अवगत करावे. तसेच कोणतेही व्यवहार करण्यापूर्वी अथवा शंका असल्यास प्रथमतः संबंधित निवृत्तीवेतन घेत असलेल्या कार्यालयांशी संपर्क साधण्यात यावा, असे आवाहन लेखा व कोषागारे संचालनालयाचे संचालक दीपा देशपांडे यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

# जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय सोलापूरला स्थलांतरासाठी प्रस्ताव

सोलापूर/प्रतिनिधीः वेळापूर (ता. माळशिरस) येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय सोलापूरमधील नार्थकोट हायस्कूलच्या जागेत स्थलांतर करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्यावतीने राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे सादर केला असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिली. देशभरात प्रत्येक जिल्ह्यासाठी एक अशी संस्था प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावणे या हेतूने स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये शिक्षण उपसंचालक दर्जाचे एक पद, वर्ग एकचे ४ अधिकारी, वर्ग २ चे ६ अधिकारी आणि १५ शिक्षकेतर पदे सदर कार्यालयासाठी मंजूर आहेत. जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था, सध्या वेळापूर या कार्यालयामार्फत २०२३-२४ मध्ये २१,६२२ शिक्षकांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. तसेच राज्य शैक्षणिक संपादणूक सर्वेक्षण आयोजन करणे, संशोधन, शिक्षण परिषदांचे आयोजन व मार्गदर्शन करणे. शासनाच्या गुणवत्ता वाढीचे उपक्रम राबवणे, यशदा अंतर्गत जिल्ह्यातील गट क व ड कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण घेणे, जिल्ह्यातील डी.एल.एड. कॉलेजचे संनियंत्रण करणे इ. कार्ये केली आहेत. सोलापूर जिल्ह्यातील शालेय शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी काम करणारे डाएटचे जिल्हास्तरीय कार्यालय जिल्हा मुख्यालयापासून जवळपास ११० किमी दूर गैरसोयीच्या ठिकाणी आहे. तसेच वेळापूर बस स्थानकापासून ३ कि.मी.दूर माळावर आहे.

या संस्थेमार्फत पूर्व प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील शैक्षणिक गुणवत्ता वाढीबाबत आढावा, मार्गदर्शन व सहाय करणे हे कार्य केले जाते तसेच विविध प्रशिक्षणांचे व्यवस्थापन, नियोजन व अनुधावन करून जिल्ह्यातील शिक्षक, क्षेत्रीय अधिकारी यांचे सक्षमीकरण करण्यासाठी कार्य केले जाते.यशदा, पुणे या संस्थेमार्फत संलग्नित राहून जिल्ह्यातील वर्ग ३ व वर्ग ४ कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण देणारी जिल्हास्तरीय शिखर संस्था म्हणून कार्य करण्याची जबाबदारी आहे. सदर कार्यालय हे नॉर्थकोट हायस्कूल येथील इमारतीत स्थलांतरित करण्याबाबत संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र यांनी राज्याच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव यांना पत्र दिले आहे. हे कार्यालय सोलापूर येथे स्थलांतरित झाल्यास जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीने तसेच शिक्षक, मुख्याध्यापक, सर्व पर्यवेक्षीय अधिकारी यांच्याशी समन्वय साधण्याचे काम आणखी परिणामकारक होईल, असे या प्रस्तावात म्हटले आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यामाई होळकर यांचा इतिहास प्रत्येक घरा घरात पोहचला पाहिजे : विनायक

**नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे :** काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत अनेक हिंदु मंदिरांचा जीर्णोद्धार करणाऱ्या तसेच तळागाळातील समाजाच्या कल्याणासाठी कार्य करणाऱ्या लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा इतिहास प्रत्येक घरापर्यंत पोहचला पाहिजे तरच खऱ्या अर्थाने आजच्या पिढीला अहिल्यादेवींचा इतिहास समजणार आहे असे माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी नळदुर्ग येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलतांना म्हटले.



दि.३० मे रोजी नळदुर्ग येथे राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मध्यवर्ती जन्मोत्सव समितीच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची २९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी अहिल्यादेवी होळकर चौकात राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. शिवाय बसस्थानकात आहिल्या माईच्या प्रतिमा पुजन माजी नगरसेवक विनायक अहंकारी, बलदेवसिंग ठाकूर, सोसायटीचे संचालक रघुनाथ नागणे, मनसेचे शहर सरचिटणीस प्रमोद कुलकर्णी व भगवंत सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन मध्यवर्ती जन्मोत्सव समितीचे सल्लागार ज्ञानेश्वर घोडके यांनी केले होते. या कार्यक्रमास ज्ञानेश्वर घोडके, मध्यवर्ती जन्मोत्सव समितीचे सुहास येडगे, पत्रकार दादासाहेब बनसोडे , प्रभाकर घोडके, विलास येडगे, दीपक घोडके एकनाथ शिरगुरे, सुनिल गव्हाणे, उत्तम बनजगोळे, बंडप्पा कसेकर, रवी ठाकुर,राजेंद्र ठाकुर आदीजन उपस्थित होते.यावेळी बोलतांना विनायक अहंकारी यांनी म्हटले की अहिल्यादेवींचे कार्य महान असुन भारताच्या इतिहासात अहिल्यादेवींचे कार्य सुवर्ण अक्षरांनी लिहिण्यासारखा आहे. समाजातील सर्व घटकांसाठी अहिल्यादेवींनी काम केले आहे. म्हणुनच त्यांना राजमाता, लोकमाता म्हणुन गौरविले जाते असेही विनायक अहंकारी यांनी म्हटले आहे. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन व आभार ज्ञानेश्वर घोडके यांनी मानले.

यावेळी नळदुर्ग बसस्थानक तसेच नगरपालिका कार्यालयातही राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले. बसस्थानकात भाजपचे भिमाशंकर बताले यांनी अहिल्यादेवींच्या प्रतिमा पुजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## पशुसंवर्धन विभागामार्फत कुक्कुट पालन प्रशिक्षणाचे आयोजन

**सोलापूर/प्रतिनिधीः** जिल्ह्यातील पशुपालक, शेतकरी, व सुशिक्षित बेरोजगारांसाठी, जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागामार्फत सधन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, सोलापूर येथे १५ दिवसाचे कुक्कुट पालन प्रशिक्षणाचे आयोजन केले असून, इच्छुकांनी दि ७ जून २०२४ पर्यंत अर्ज करावेत असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. एन.एल. नरळे यांनी केले आहे सदर प्रशिक्षणाचा कालावधी दि. १० जून ते २४ जून २०२४ पर्यंत असून, प्रशिक्षणार्थ्यांसाठी शैक्षणिक पात्रता किमान ७ वी पास असणे अपेक्षित आहे. तसेच सदर प्रशिक्षण सुशिक्षित बेरोजगारांना सुवर्ण संधी आहे. सदर प्रशिक्षणासाठी प्रवेश फी सर्व प्रवर्गासाठी १००/- रुपये आकारण्यात येईल सोबत शाळा सोडण्याचा दाखला, जातीचा दाखला, आधार कार्ड, फोटो जोडणे आवश्यक आहे.

सदर प्रशिक्षणासाठी पशुधन विकास अधिकारी डॉ. एस. एम. बोधनकर, सधन कुक्कुट विकास गट, नेहरू नगर, बी.पी.एड. कॉलेज जवळ, सोलापूर, यांच्याकडे संपर्क साधावा असे आवाहनही जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नरळे यांनी केले आहे

## चारधाम यात्रेकरूंसाठी पूर्व नोंदणी आवश्यक

डेहराडून : भाविकांची संख्या वाढतच असल्याच्या पार्श्वभूमीवर चारधाम येथील भाविकांच्या दर्शनाची प्रक्रिया सुरळीत पार पाडावी आणि त्यांना कोणत्याही गैरसोयींचा सामना करावा लागू नये तसेच त्यांचे दर्शन सुलभ व्हावे यासाठी उत्तराखंड शासनाने धाम यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांसाठी ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया सुरु केली असून दर्शनासाठी नोंदणी करणे अनिवार्य आहे.


# समाज विघातक मनुस्मृती शैक्षणिक विषय होवूच शकत नाही

## देशव्यापी संविधान जन जागृती व साक्षरता अभियान आयोजक डॉ.माकणीकर यांचे मत

**मुंबई/दैनिक यशसिध्दि न्यूज**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित संविधानाने राज्य असून, बाबासाहेबांनी अख्खी च्या अख्खी मनुस्मृती जाळून टाकली आहे, त्यामुळे समाज विघातक मनुस्मृती शैक्षणिक विषय होवूच शकत नाही. शिकवायचेच असेल तर भारतीय संविधान शिकवा असे मत देशव्यापी संविधान जनजागृती व साक्षरता अभियानचे राष्ट्रीय आयोजक पँथर डॉ राजन माकणीकर यांनी व्यक्त केले.महाड या ऐतिहासिक ठिकाणी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती दहन केली होती त्याच धर्तीवर वर चांगल्या इतिहासाची पुनरावृत्ती म्हणून जाहीर निषेधार्थ शरद पवार राष्ट्रवादी गटाचे आमदार श्री. जितेन्द्र आव्हाड यांनी मनुस्मृती दहन कार्यक्रम आखून शिंदे फडणवीस आणि अजित पवार सरकारच्या शैक्षणिक धोरणाचा कडाडून विरोध केला. यावेळी अनावधानाने गालबोट लागले, जितेंद्र आव्हाड हे बाबासाहेबांना बाप मानतात आणि कोणता बाप मुलाला माफ करणार नाही? अस होणार नाही, त्यामुळे त्या प्रकरणाचे राजकरण कुणीही करू नये अशी विनंती धम्मसेवक डॉ. माकणीकर यांनी केली आहे.

समाजभूषण डॉ माकणीकर म्हणाले की, आव्हाडांनी मनुस्मृती जाळली याचा भाजपा व त्यांच्या




समर्थक पक्षांना राग नाही आला पण बाबासाहेबांचा फोटो असलेले पोस्टर जाळले याचा राग आला अस भासवून ते आव्हाड विरोधी वातावरण निर्माण करत आहेत, आंबेडकरी समाजाने आपापल्या गावात मनुस्मृतीचे दहन करून या सरकारचा निषेध व्यक्त करून आव्हाडांच्या प्रमाणिक आंदोलनाला कृतीतून समर्थन नोंदवावे तसेच मनुस्मृती शिकवणीचा निर्णय सरकारला मागे घेण्यास भाग पाडावे. रिपब्लीकन पँथर नेते दिवंगत ईश्वर कांबळे यांच्या इच्छेनुसार देशव्यापी संविधान जनजागृती व साक्षरता अभियान अंतर्गत आम्ही मागील २५ वर्षापासून भारतीय संविधान शालेय माध्यमिक अभ्यासक्रमात शिकवनी साठी स्वतंत्र विषय म्हणून समाविष्ट करण्यात यावे यासाठी अभियान राबवत असून त्यासंदर्भातील पत्रव्यवहार शासन व प्रशासनात केला आहे, या मनुवादी सरकारच्या बुद्धात दम असेल आणि खरच काही शिकवायचे असेल तर डॉ. आंबेडकर लिखित भारतीय संविधान शिकवावे. असे आंबेडकरी कट्टर समर्थक डॉ माकणीकर म्हणाले.

मोदी सरकार मुळातच संविधान विरोधी असून बहुजनांच्या हक्काचे संरक्षण करणाऱ्या संविधानाची आधीच त्यांनी पायमल्ली केली आहे, त्यामुळे त्यांनी डावपेच करून विविध राज्यात सरकारे बनवली आहेत ती असंवैधानिक सरकारे आहेत असे मला वाटते, त्यामुळे मोदींच्या नेतृत्वात असलेल्या सरकार कडून भारतीय संविधानाच्या समर्थनात कोणती अपेक्षा होणे अशक्यप्राय आहे. अशी निराशा ही विद्रोही पत्रकार डॉ. राजन माकणीकर यांनी व्यक्त केली.

# साहेब गरज नसलेल्या भक्ति महामार्ग करून आम्हाला भूमी हिन करू नका शेतकऱ्याची जिल्हाधिकारी साहेब यांना अर्थाहक

**बुलढाणा /राहुल साबळे**

बुलढाणा जिल्ह्यातील भक्ती महामार्ग शासनाने होऊ घातलेला आहे त्यामध्ये समृद्धी महामार्ग ते शेगाव या रोडमध्ये १०९ गावची शेकडो ऐकर जमीन शासन शासनाच्या भावाने अधिग्रहण करून शेतकऱ्यांना भुमिहीन करण्याचा डाव शासनाने आखला आहे त्याबाबत भक्ती महामार्ग



कृती समितीने वेळोवेळी निवेदन देऊन व हरकती नोंदवून शासनाला विरोध दर्शवला आहे तरीसुद्धा शासनाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नसेल मुळे अखेर ३०मे रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा येथे उपोषण करण्याचे ठरले होते परंतु आचारसंहितेमुळे जिल्हाधिकारी साहेबांनी सदर उपोषण पुढे ढकलण्यात यावे अशी माहिती दिली असता सदर निवेदन हे पुढे ढकलण्यात आले आहे परंतु आज दिनांक ३० मे २०२४ रोजी भक्ती महामार्ग कृती समितीच्या सदस्यांनी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांना भक्ती महामार्ग होऊ नये म्हणून एक निवेदन दिले आहे त्यामध्ये शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी साहेब यांना एक अर्थहाक दिले आहे की साहेब हा गरज नसलेला भक्ति महामार्ग करून शेतकऱ्याच्या जमिनी अधिग्रहण करू नका आम्हाला देशोधडीला लावू नका शेगावला जाण्यासाठी पर्याय चार रस्ते असताना सुद्धा भक्ती महामार्गाची गरज नसताना सुद्धा भक्ती महामार्ग होऊ घातलेला आहे त्याला आम्हा शेतकऱ्यांचा पूर्णतः विरोध आहे लोकसभेच्या निवडणुकीमध्ये गावागावांमध्ये शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींना गावात येऊ न देण्याचे बॅनर सुद्धा झळकवले होते ३० मे रोजी शांततेत उपोषण होणार होते परंतु जिल्हाधिकारी साहेब यांनी कायद्याचा भंग होऊ नये म्हणून सदर उपोषण हे पुढे ढकलण्यात आले आहे यापूर्वी सुद्धा ७/३/ २०२४ रोजी हजारो शेतकऱ्यांच्या प्रतिनिधी यांनी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांची भेट घेतली होती परंतु नंतर आचारसंहिता लागू असल्यामुळे त्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही तरी माननीय जिल्हाधिकारी साहेब यांच्यामार्फत शासनाला विनंती आहे की गरज नसलेला भक्ति महामार्ग करून नाही आणि शेतकऱ्यांना देशोधडीला लावू नाही अशी मागणी भक्ती महामार्ग कृती विरोधी समितीची सदस्यांनी जिल्हाधिकारी साहेब यांच्याकडे केली आहे सदर निवेदन देतेवेळी समाधान मस्के दासा पाटील वाघ सर गजानन चांदले एकनाथ माळेकर विनायक सरनाईक डॉक्टर सत्येंद्र भुसारी मस्के पत्रकार अंढेरा व इतर शेतकरी निवेदन देते वेळेस जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे हजर होते